ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख १३ मे, १९५३ अंक १९

## विविध माहिती

**सीलोनला जपानची मदत**—जपानी कारखानदार आणि सीलोनचे कारखानदार ह्यांच्या दरम्यान सध्या चालू असलेली बोलणीं यशस्वीं झालीं तर सीलोनमध्यें नवे उद्योगधंदे काढण्यास जपान मदत करणार आहे. सीलोनमध्यें शिवण्याचीं यंत्रें, सायकली, इत्यादि वस्तू तयार करणारे कारखाने काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**भारतामधील सायकलींचें उत्पादन**—१९५१ सालीं भारतामध्यें १,१४,२७५ सायकली उत्पादन करण्यांत आल्या. १९५२ सालीं वरील संख्येपेक्षा ८२,६८१ अधिक सायकली तयार करण्यांत आल्या.

**मधमाशांचा नवा उपयोग**—अमेरिकेच्या ॲटॉमिक एनर्जी कमिशननें हैड्रोजन बॉम्बचा शोध लावण्याच्या प्रयत्नांत ५,००,००० मधमाशांचें साह्य घेतलें आहे. शास्त्रज्ञांना असें आढळून आलें आहे कीं, कांहीं मधमाशा जो मध गोळा करतात त्यांत 'ड्यूटेरिअम' नांवाचें महत्त्वाचें खनिज असतें. ह्या खनिजाला हैड्रोजन बॉंबच्या निर्मितींत फार महत्त्व आहे.

**भारतामधील वृत्तपत्रांची सोय**—लंडनमध्यें सुरू झालेल्या ब्रिटिश इंडस्ट्रीज फेअरमध्यें ताजीं भारतीय वृत्तपत्रें मिळण्याची सोय करण्यांत आली आहे. भारतामधील प्रमुख वृत्तपत्रें तीं प्रसिद्ध झाल्यापासून १४ तासांच्या आंत प्रदर्शनांतील बी. ओ. ए.सी. च्या स्थानकावर मिळूं शकतील. जेटचीं विमानें चालू झाल्यानें जग किती लहान झालें आहे, तें दाखविण्यासाठी ही व्यवस्था मुद्दाम करण्यांत आली आहे.

**विद्यार्थ्यांना देणग्या**—कलकत्ता येथील भारतीय विद्यार्थी आरोग्य-केंद्राला मॉस्कोच्या फॅसिस्ट-विरोधी युवक-संघटनेनें क्ष-किरणानें फोटो काढण्याची यंत्रसामुग्री भेट म्हणून पाठविली आहे, रुमेनिआच्या विद्यार्थ्यांनीं शस्त्रक्रियेचीं उपकरणीं धाडलीं असून आइसलंडच्या विद्यार्थ्यांनीं २३,६०० पौंड कॉडलिव्हर तेल पाठविलें आहे.

**घराच्या नमुन्याचें प्रदर्शन**—मुंबई येथें लॉइडस् मैदानावर सध्या भरविण्यांत आलेल्या औद्योगिक प्रदर्शनांत गोद्रेज कंपनीनें घराचा एक स्वयंनिर्मित नमुना ठेवला आहे. ह्या घरांत तीन खोल्या असून त्यांत वापरावयाचें पोलादी फर्निचरसुद्धां कंपनीनेंच तयार केलेलें आहे. फर्निचरची किंमत माफक असून तें छोटेखानी घरांत वापरण्यासाठी मुद्दाम बनविलेलें आहे.

**पोस्ट खात्याचा छपाईचा खर्च**—भारताच्या पोस्ट आणि टेलिग्राफ खात्याचा छपाईचा वार्षिक खर्च सुमारें ९४ लाख रुपये होतो, असें समजतें.

**ब्रिटनचा बोलपटाचा धंदा**—ब्रिटनचा बोलपटाचा धंदा आर्थिक दृष्ट्या अडचणींत सापडल्याचें सरकारी अहवालावरून समजतें. १९५४ सालीं कोणत्याहि बोलपट कंपनीला आपल्या स्वत:च्या पैशांतून चांगला चित्रपट काढतां येणें अशक्य झालें असल्याचें अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे.

**चीनमधील घटस्फोटांच्या संख्येंत वाढ**—चीनमध्यें कम्युनिस्ट राजवट आल्यापासून घटस्फोटांची संख्या वाढत चालल्याचें दिसतें. १९५० सालीं १,८६,१६७ घटस्फोट घेण्यांत आले होते. १९५२ सालीं पहिल्या सहा महिन्यांतच ३,९८,२४३ घटस्फोट घेण्यांत आले. कम्युनिस्ट राजवट आल्यापासून घटस्फोटाचा कायदा शिथिल करण्यांत आल्याचा हा परिणाम असावा, असें म्हणतात.

**मध्यप्रदेशांत पाऱ्याचा शोध**—मध्य प्रदेशांतील भंडारा जिल्ह्यांतील एका मँगेनीझच्या खाणींत पाऱ्याचा शोध लागला असल्याचें समजतें. खाणींत पारा सांपडतो असें आढळून आल्यावर ती खाजगी मालकीची असली तरी बंद ठेवण्यांत आली आहे. कारण, पारा ही वस्तू युद्धोपयोगी आहे. पाऱ्याच्या निर्यातीमुळें भारताला डॉलर्स मिळूं शकतात.

**नागपूर शहरांत २०,००० सायकली**—नागपूर कॉर्पोरेशनच्या कचेरींत २०,००० सायकलींची नोंद करण्यांत आली आहे. कॉर्पोरेशननें सायकलवर वार्षिक दोन रुपये कर बसविला आहे. बिल्ला घेण्यासाठी ४ आणे वेगळे द्यावे लागणार आहेत.

**रॉकफेलर फौंडेशनची मदत**—नागपूर येथील मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. शर्मा ह्यांना अमेरिकेच्या रॉकफेलर फौंडेशनकडून ३,७०० डॉलर्सची मदत मिळाली आहे. अमेरिका व कॅनडा येथील वैद्यकीय शिक्षणासंबंधींच्या आधुनिक प्रवृत्ती अभ्यासण्याचें कार्य त्यांनीं करावयाचें आहे. हें काम ते १९५३ च्या पहिल्या तिमाहीपुरतें करणार आहेत.

**दिल्लीमधील सरकारी इमारती**—नवी दिल्ली येथें सरकारी मालकीच्या ३४,२०० इमारती आहेत आणि ७,५०० इमारती खाजगी मालकीच्या आहेत.

**६०,००० रुपये किंमतीचें घड्याळ**—बनारस येथें अचूक भारतीय वेळ दाखविणारें एक घड्याळ लावण्यांत येणार आहे. ह्या घड्याळाची किंमत ६०,००० रुपये असून तें विजेवर चालणारें आहे. उत्तर-प्रदेश सरकारनें वेधशाळेवर लावण्यासाठी एका जर्मन कंपनीकडून तें मागविलें आहे.

### भारताचा आर्थिक विकास : डॉ. राव ह्यांचे विचार

दिल्ली येथील स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे संचालक डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनी भारताच्या औद्योगिक विकासाविषयीं पुढील महत्त्वाचे विचार एका प्रसंगीं व्यक्त केले आहेत, "अर्था"च्या वाचकांसाठी ते थोडक्यांत दिले आहेत.

"१९ व्या शतकांत प. युरोपांतील देशांत औद्योगिक क्रांति झाली. पण तींबरोबरच उत्पादन वाढलें, भांडवल वाढलें आणि भांडवलाची निपजहि वाढली. त्यामुळें लोकांच्या रहाणीचें मान वाढविणें शक्य झालें. अर्थात् ह्या प्रगतीची किंमत म्हणून बरीच आर्थिक ओढाताण ह्या देशांना सहन करावी लागली. ब्रिटन-सारख्या पाश्चिमात्य देशांनीं वसाहतींची पिळणूक करून आपली आर्थिक प्रगति साधली. अमेरिकेनें देशांत बाहेरून आलेल्या मजुरांची पिळणूक केली व जपाननें कोरिआंतील व मांच्युरिआंतील स्वस्त मजुरीचा फायदा घेतला. रशिआंतील लोकांना आपल्या प्रगतीसाठी बरेच कष्ट आणि त्याग करावा लागला. भारत परतंत्र असेपर्यंत त्याला अशा प्रकारची संधीच मिळाली नाहीं. स्वातंत्र्योत्तर कालांत आर्थिक प्रगति करून जनतेचें रहाणीचें मान सुधारण्याची खटपट भारतानें सुरू केली. हें साध्य करण्या-साठीं भांडवल, यंत्रसाहित्य, औद्योगिक शक्ति आणि अवजड कारखानदारी ह्या गोष्टींची आवश्यकता आहे. स्वराज्यप्राप्तीची आकांक्षा उराशीं बाळगलेल्या गरीब भारतीयांना आणखी त्याग करावयास सांगणें अवघड आहे. भारताच्या पंचवार्षिक कार्य-क्रमाचा उद्देश उत्पादन वाढविण्याचा आहे. पण हा कार्यक्रम म्हणजे देशांतील बेकारी नाहींशीं करण्याच्या अनेक कार्यक्रमांपैकीं एक आहे. भारतानें आपलें आर्थिक धोरण व कार्यक्रम अल्प मुदतीचे ठेवावे. गेल्या कांहीं महिन्यांत भारताचा निर्यात-व्यापार घटला आहे व त्यामुळें बेकारांची संख्या अधिकच वाढली आहे. अवर्षण आणि दुष्काळ ह्यांच्या तडाख्यांत सांपडलेल्या नागरिकांना सरकार जशी मदत करतें, तशीच मदत बेकारांना करणें अवश्य आहे."

---

### मराठा चेंबरचें नवें कार्यकारी मंडळ

मराठा चेंबरच्या १९५३–५४ च्या नव्या वर्षासाठीं कार्य-कारी मंडळावरील जागांसाठीं खालीलप्रमाणें उमेदवारींचीं सूचना-पत्रें मुदतींत येऊन अविरोध निवडणूक झाली असल्याचें समजतें. सदस्यांच्या १९ जागांपैकीं ४ जागा रिकाम्या आहेत.

अध्यक्ष (१):— श्री. गं. ल. नातु, मुंबई.

उपाध्यक्ष (४):— श्री. ग. रा. साठे, दा. वा. पोतदार, शं. ल. किर्लोस्कर व रा. ग. विजयकर (विश्वभारती इं. कं. लि, मुंबई).

खजिनदार (१):—श्री. श्री. श्री. मराठे, (भारत पेन्सिल्स) पुणें.

कार्यवाह (२):—श्री. गो. द. आपटे, आ. रा. भट.

इतर सदस्य (१२):—श्री. गो. ग. दांडेकर (जी. जी. दांडेकर मशीन वर्क्स लि.,) श्री. म. जोशी, चिं. गो. आगाशे, वि. म. देवल, वा. गो. भागवत (ऑल इंडिया मोटार ट्रॅन्सपोर्ट म्यु. इं. कं. लि.), म. स. पारखे (पेपर ॲंड पल्प कन्व्हर्शन्स लि.), पु. का. दिवेकर (माधवनगर कॉटन मिल्स लि.), कृ. ह. ढमढेरे, मुंबई, मा. वा. मेहेंदळे, पुणें, म. वि. पुराणिक, पनवेल, शं. र. ठाकूर (ठाकूर सावदेकर कं.), त्रिं. रा. साठे (असोसिए-टेड रिसर्च लॅबोरेटरीज्, भोर).



किर्लोस्कर



पंहातप

उन्हाळी पिकासाठीं व घरगुती पाणी पुरवठ्या-साठीं खात्रीची उपाय योजना.

विशेष माहितीसाठीं लिहा.



सेंट्रिफ्युगल पंप

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी द. सातारा



दि
युनायटेड कमर्शिअल बॅंक लि.
कलकत्ता.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ | कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ | कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ | कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७१ | लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोयंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल गोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बॅंकेच्या शाखा असल्यानें आणि बॅंकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बॅंकिंगची सेवा करण्यास बॅंक सुसज्ज आहे.

४९–अ, फेंचर्च स्ट्रीट, येथें आमची लंडन शाखा १८ मे, १९५३ रोजीं सुरू होईल.



'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बॅंका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बॅंक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

# अर्थ

बुधवार, ता. १३ मे, १९५३





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## डेफिसिट फायनान्सच्या मर्यादा

पंचवार्षिक योजना पुरी होण्यास नेहमींची बचत पुरी पडणार नाहीं. सरकारला आणि लोकांना ज्यास्त पैसा उभारण्यासाठी शिकस्तीचे प्रयत्न करावे लागतील आणि देशाबाहेरूनहि भांडवल मिळविण्याची खटपट करावी लागेल. आर्थिक प्रगतीच्या मार्गांत पैशाची आडकाठी येऊं देतां कामा नये, त्यासाठी ज्यास्त नोटा छापाव्या लागल्या तरी हरकत नाहीं, असें म्हणणें सोईचें वाटतें. परंतु, सामाजिक व आर्थिक परिणामांच्यां दृष्ट्या चलन-वाढीचा उपाय हा फार महाग पडतो. ज्यांना आजच बोजा सोसत नाहीं अशांचे हातांतून प्राप्ति काढून घेऊन ती दुसऱ्यांच्या हातीं दिली जाते. चलनवाढीमुळें वाढलेलें उत्पन्न बचतीच्या रूपानें पुनः कामास येत नाहीं; उलट फक्त कांहीं लोकांची रहाणी खर्चिक करण्यांत त्याचा परिणाम होतो. आर्थिक संसाराचा तोल त्यामुळें बिघडतो आणि सामाजिक दृष्ट्या कमी उत्पादक बाबींकडे पैशाचा ओघ वळतो.

पैशाचा पुरवठा वाढला, म्हणजे प्रत्येक वेळेसच असा दुष्परिणाम घडतो असें मात्र नाहीं. पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीस म्हणजे वाढणाऱ्या उत्पादनास व त्याच्या उठावास पैशाचा पुरवठाहि वाढत्या प्रमाणावर लागणें आवश्यकच आहे. परदेशी हुंडणावळ ज्यास्त प्रमाणांत मिळविणें, रिझर्व्ह बँकेनें क्रेडिट निर्माण करणें किंवा शेड्यूल्ड बँकांनीं क्रेडिट निर्माण करणें, हे पैशाचा पुरवठा वाढविण्याचे तीन प्रकार आहेत. पंचवार्षिक योजनेसाठी परदेशांतून यंत्रसामुग्री वगैरे आयात करणारा भारत परदेशी हुंडणावळ नव्यानें साठवूं शकणार नाहीं; उलट शिलकी हुंडणावळीचाच उपयोग करावा लागेल. तेव्हां, रिझर्व्ह बँकेनें क्रेडिट निर्माण करून व त्यांत व्यापारी बँकांनीं भर घालूनच पैशाचा पुरवठा वाढूं शकणार आहे.

म्हणूनच, भारत सरकारला रिझर्व्ह बँकेकडून कर्जाऊ रक्कम घ्यावी लागली तर तें समर्थनीयच नव्हे, तर अपरिहार्य होईल. त्यालाच 'डेफिसिट फायनान्सिंग' असें म्हणतात. चलनवाढ टाळतां आली तर फार उत्तम, पण थोड्या डेफिसिट फायनान्सिंगला कांहीं हरकत दिसत नाहीं. किंमतींचें मान साधारण स्थिर ठेवून अर्थव्यवस्था प्रगतिपथावर राखण्यासाठी सध्याच्या काळांत रिझर्व्ह बँकेकडून सरकारनें कांहीं रकमा कर्जाऊ घेणें सयुक्तिकच ठरेल. किती डेफिसिट फायनान्स योग्य व कोणत्या मर्यादेपलीकडे तो गेला म्हणजे अयोग्य, हें ठरविणें मात्र फार कठीण आहे. किंमती वाढूं न देतां, देशाच्या पैशाच्या वाढत्या पुरवठ्याची गरज भागविण्यापुरती रक्कम अशा रीतीनें उभारली तर तो डेफिसिट फायनान्स मर्यादेंत राहील.

पैशाचा पुरवठा हळुहळू वाढवावयाचा, त्याच्या परिणामांकडे काळजीपूर्वक सतत लक्ष द्यावयाचें आणि किंमती वाढण्यांत परिणाम होणाऱ्या, अगदी जरूरीपेक्षा ज्यास्त पुरवठ्यास वेळींच पायबंद घालावयाचा, अशा पद्धतीनें डेफिसिट फायनान्सचा घातुकपणा आटोक्यांत राखतां येईल. म्हणजे, रिझर्व्ह बँक व सरकारचें अर्थ-खातें ह्यांनीं डोळ्यांत तेल घालून, जरूरीप्रमाणें वेळोवेळ उपाययोजना केली पाहिजे.

गेल्या कांहीं वर्षांत, भरमसाठ चलनवाढीस आळा घालण्याचे बाबतींत आपल्या सरकारचे प्रयत्न बरेच यशस्वी झालेले आहेत आणि त्याचें श्रेय जाणतेपणानें व निश्चयपूर्वक अंगीकारलेल्या सरकारी धोरणास दिलें पाहिजे. अशाच पद्धतीनें ह्यापुढेंहि धोरण राहिलें, तर डेफिसिट फायनान्स आवाक्याबाहेर जाऊन भरमसाठ चलनवाढ होण्याची भीति उरूं नये. परदेशांतून मोठ्या प्रमाणावर भांडवली मदत मिळाली, तर त्या प्रमाणांत चलनवाढ व किंमतवाढ मर्यादेंत रहाण्यास मदत होईल. आपल्या लोकांच्या प्रयत्नांवर व त्यागावर आपल्या पंचवार्षिक योजनेचें यश अवलंबून आहे, हें तर खरेंच; परंतु त्याबरोबरच परदेशांच्या भांडवली मदतीवरहि आपली बरीच मदार आहे, हें उघड आहे.

इंटर नॅशनल मोनेटरी फंडाच्या मंडळाचे नेते, मि. बर्नस्टीन, ह्यांनीं भारत सरकारच्या डेफिसिट फायनान्सिंगच्या धोरणाच्या मर्यादा स्पष्ट करून सांगतांना व्यक्त केलेले हे विचार उद्बोधक आहेत. नोटा काढून पैशाचा पुरवठा वाढविण्यांतील धोके त्यांनीं दाखविले, आणि ते धोके टाळण्यासाठी रिझर्व्ह बँक व अर्थखातें ह्यांनीं किती दक्षतेनें उपाययोजना केली पाहिजे, हेंहि स्पष्ट केलें. पंचवार्षिक योजनेची व्याप्ति फारच लहान, निराशाजनक, आहे असें म्हणणारांना ह्या मर्यादित योजनेस पैसा पुरवितांना येणाऱ्या अडचणींची कल्पनाहि नसते; आणि ह्या अडचणींचा निरास करण्याची ज्यांचेवर जबाबदारी पडते, त्यांनीं जरूर ती जबाबदारी पत्करूनहि शक्य तेवढी व्यवहार्य योजना आखली आहे, असेंच म्हटलें पाहिजे. योजनेच्या विस्तारापेक्षा, केलेली योजना पार पाडण्याचें आर्थिक सामर्थ्य निर्माण करण्याकडे प्रथम व जरूर पडलीच तर वेळींच योजना आंखडण्याकडे जबाबदार लोकांचें लक्ष असावयास पाहिजे.

---

**आणखी ६५० नलिकाकूप**—भारत सरकार आणि अमेरिकन सरकार यांचे दरम्यान झालेल्या पुरवणी कार्यवाही करारान्वयें पुढील तीन वर्षांत पंजाब, उत्तर-प्रदेश आणि बिहार या राज्यांत मिळून आणखी ६५० नलिकाकूप खोदण्यांत येणार आहेत. या योजनेसाठी अमेरिका ५२·६ लक्ष डॉलर्स आणि भारत सरकार २·२० कोटी रु. खर्च करणार आहे.

**बडोदा तालुक्यांतील सहकारी संस्था**—बडोदा तालुक्यांतील १२२ खेडेगांवांपैकी ८६ खेडेगांवांत मिळून ६७ सहकारी संस्था आहेत. त्यांपैकी ४० पतपेढ्या असून त्यांनीं २,३४,००० रुपये कर्जाऊ दिलेले आहेत.

**सिनेमा फिल्म्ससाठी अमेरिकेस खंडणी**—सिनेमागृहांत दाखविलेल्या फिल्म्सचें भाडें म्हणून भारतानें अमेरिकेला १९५१ मध्यें ३८·२६ लक्ष रु. व १९५२ मध्यें ३१·७२ लक्ष रु. पाठविले. ग्रेट ब्रिटनकडे अनुक्रमें २·३१ लक्ष रु. व ०·२९ लक्ष रु. गेले.

# THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LIMITED, POONA

*Balance Sheet as at 31st December 1952*

## CAPITAL AND LIABILITIES

| | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Capital :** | | | |
| **Authorised Capital** | | | |
| 10,000 Shares of Rs. 100 each ... | | | 10,00,000—0—0 |
| **Issued Capital** | | | |
| 10,000 Shares of Rs. 100 each ... | | | 10,00,000—0—0 |
| **Subscribed & Paid-up Capital** | | | |
| 10,000 Shares of Rs. 100 each : Rs. 75 per share called up ... | | 7,50,000—0—0 | |
| Less— 336 Shares forfeited ... | | 25,200—0—0 | |
| 9,664 ... | | 7,24,800—0—0 | |
| Less—Calls unpaid ... | | 12,200—0—0 | |
| | | 7,12,600—0—0 | |
| Add.—Forfeited shares ... | | 12,310—0—0 | 7,24,910—0—0 |
| 1. (a) Calls in Advance | | | 24,700—0—0 |
| 2. Reserve Fund & Other Reserves | | | 1,73,515—7—2 |
| 3. Deposits & Other Accounts | | | |
| Fixed Deposits ... | | 24,34,334-11—0 | |
| Savings Bank Deposits ... | | 16,68,602-14-10 | |
| Current Accounts, Contingency Accounts, etc. ... | | 20,76,179—7—7 | 61,79,117—1—5 |
| 4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc. | | | |
| (i) In India ... | | 0—0—0 | |
| (ii) Outside India ... | | 0—0—0 | 0—0—0 |
| Particulars : | | | |
| (i) Secured ... | | Nil | |
| (ii) Unsecured ... | | Nil | Nil |
| 5. Bills Payable | | | 32,396—0-10 |
| 6. Bills for Collection being Bills, Receivable as per Contra | | | |
| (i) Payable in India ... | | 1,47,174—1—9 | |
| (ii) Payable outside India ... | | 0—0—0 | 1,47,174—1—9 |
| 7. Other Liabilities | | | 51,106-14—1 |
| 8. Acceptances, Endorsements & Other Obligations per Contra | | | 0—0—0 |
| 9. Profit and Loss | | | |
| Profit as per Last Balance Sheet ... | | 70,644—3—9 | |
| Less—Appropriations :— | | | |
| (i) Reserve Fund | 23,200—0—0 | | |
| (ii) Dividend | 25,207-10—0 | | |
| (iii) Provision for Income-Tax and Corporation Tax | 16,000—0—0 | | |
| (iv) Reserve for Investments | 5,500—0—0 | 69,907-10—0 | |
| | | 736—9—9 | |
| Add—Profit for the year brought from the Profit and Loss Account | | 72,809—7-10 | 73,546—1—7 |
| Total Rs. ... | | | 74,06,465-10-10 |

( See Profit and Loss Account on Page 158 )

# THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LIMITED, POONA

***Balance Sheet as at 31st December 1952***

**PROPERTY AND ASSETS**

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash** | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank ... | | 6,95,688—9—11 |
| **2. Balances with Other Banks (in current account)** | | |
| (i) In India ... | 3,31,672—5—5 | |
| (ii) Outside India ... | 0—0—0 | 3,31,672—5—5 |
| **3. Money At Call And Short Notice** | | 0—0—0 |
| **4. Investments at Cost** | | 25,00,144—2—0 |
| (i) Securities of the Central & State Governments & Other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments ... | 23,08,494—2—0 | |
| (Average Market value: Rs. 21,40,908-6-0) | | |
| (ii) Shares: Ordinary Shares fully paid-up (Realisable value: Rs. 91,650/-) | 91,650—0—0 | |
| (iii) Debentures or Bonds ... | 0—0—0 | |
| (iv) Other Investments (A Fixed Deposit with a Co-op. Housing Society, Ltd.) ... | 1,00,000—0—0 | |
| (Realisable value: Rs. 1,00,000/-) | | |
| (v) Gold ... | 0—0—0 | |
| (Investments which have no market quotations have been shown at their realisable value) | 25,00,144—2—0 | |
| **5. Advances** | | |
| (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors) | | |
| Particulars as per schedule :— ... | | 36,30,443—2—9 |
| (1) Loans, Cash Credits, Overdrafts, etc. :— | | |
| (i) In India ... | 35,05,681-12—0 | |
| (ii) Outside India ... | 0—0—0 | |
| | 35,05,681-12—0 | |
| (2) Bills Discounted & Purchased (excluding Treasury Bills of the Central & State Governments) :— | | |
| (i) Payable in India ... | 1,24,761—6—9 | |
| (ii) Payable outside India ... | 0—0—0 | |
| | 36,30,443—2—9 | |
| **6. Bills Receivable Being Bills for Collection as per Contra** | | |
| (i) Payable in India ... | 1,47,174—1—9 | |
| (ii) Payable outside India ... | 0—0—0 | 1,47,174—1—9 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endrosements and Other Obligations per Contra** | | 0—0—0 |
| **8. Premises** | | |
| Cost as per last Balance Sheet ... | 25,013-14—0 | |
| Less—Total Depreciation written off ... | 5,988-14—0 | 19,025—0—0 |
| **9. Furniture And Fixture** | | |
| Cost as per last Balance Sheet ... | 34,935—3—6 | |
| Additions during the year ... | 3,268—3—6 | |
| | 38,203—7—0 | |
| Less—Sales ... | 0—0—0 | |
| Less—Total Depreciation written off ... | 12,164—3—0 | 26,039—4—0 |
| **10. Other Assets Including Silver** | | |
| (i) Interest accrued on Investments ... | 22,844-13—0 | |
| (ii) Printing & Stationery on hand ... | 10,550—0—0 | |
| (iii) Deposits with Electric and Telephone Companies ... | 2,374—8—0 | |
| (iv) I. Tax paid in advance ... | 12,709-12—0 | |
| (v) Legal Expenses recoverable ... | 900—0—0 | |
| (vi) Advance payment for purchase of Property at 1217 Shivajinagar, Poona 5 ... | 6,900—0—0 | 56,279—1—0 |
| **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** | | 0—0—0 |
| **12. Profit And Loss** | | 0—0—0 |
| Total Rs. ... | | 74,06,465-10-10 |

( See Profit and Loss Account on Page 158 )

# THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, LIMITED, POONA

## SCHEDULE

*( Referred to in the Balance Sheet )*

| Particulars | Loans, Advances, Cash Credits and Overdrafts | Bills Discounted and Purchased |
|---|---|---|
| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
| 1. Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured. ... | 21,79,680—8—5 | 6,796–10–0 |
| 2. Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security... | 12,89,149–15—8 | ... |
| 3. Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors. ... | 36,851—3–11 | 1,17,964–12—9 |
| 4. Debts considered doubtful or bad, not provided for. ... | 0—0—0 | ... |
| Total Rs. ... | 35,05,681–12—0 | 1,24,761—6—9 |
| 5. Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | ... | ... |
| 6. Debts due by Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or, in the case of Private Companies, as Members. ... | 94,945–14—7 | ... |
| 7. Maximum total amount of advances, including temporary advances, made at any time during the year to Directors, or Managers, or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons... | ... | ... |
| 8. Maximum total amount of advances, including temporary advances, granted during the year to the Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or, in the case of Private Companies, as Members. ... | 1,08,848—0—7 | ... |
| 9. Due from Banking Companies. ... | ... | ... |

## *The Profit and Loss Account for the Year ended 31st December 1952*

| EXPENDITURE | Rs. As. Ps. | INCOME | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 1. Interest paid on Deposits and Borrowings, etc. ... | 1,51,975—7—0 | ( Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary provisions.) | |
| 2. Salaries and Allowances and Provident Fund ( including salary and allowances to Managing Director and Manager Rs.17,450)... | 84,885—9—4 | 1. Interest and Discount ... | 3,36,358–0—3 |
| 3. Directors' and Local Committee Members' Fees and Allowances ... | 3,433—0—0 | 2. Commission, Exchange and Brokerage ... | 9,623–9—8 |
| 4. Rent, Taxes, Insurance, Lighting, etc. | 4,961–15—3 | 3. Rent ... | 360–0—0 |
| 5. Law Charges ... | 0—0—0 | 4. Net Profit on sale of Investments, Gold and Silver, Land, Premises and other assets (not credited to Reserves or any particular Fund or Account). ... | 61–4—0 |
| 6. Postage, Telegrams and Stamps ... | 2,228–8—3 | 5. Net Profit on Revaluation of Investments, Gold and Silver, Land, Premises and other assets (not credited to Reserves or any particular Fund or Account) ... | 0–0—0 |
| 7. Auditor's Fees | 1,200—0—0 | 6. Income from Non-Banking Assets and Profit from sale of or dealing with such assets ... | 0–0—0 |
| 8. Depreciation on and Repairs to the Banking Company's Property... | 5,059–11—6 | 7. Other receipts ... | 1,242–8—0 |
| 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 10,151—8—6 | 8. Loss if any ... | 0—0—0 |
| 10. Loss from sale of or dealing with Non-Banking Assets ... | 0—0—0 | | |
| 11. Other expenditure ... | 10,940—2—3 | | |
| 12. Balance of Profit ... | 72,809—7—10 | | |
| Total Rs. ... | 3,47,645—5–11 | Total Rs. ... | 3,47,645–5–11 |

G. R. Sathe *Chairman*
D. G. Bapat *Vice-Chairman*

C. G. Joshi *Accountant.* G. D. Joglekar *Manager.* C. T. Chitale *Managing Director.*

S. M. Joshi, W. P. Vaidya, L. R. Dhadphale, G. U. Chitale, L. M. Joshi, M. M. Gadre, S. G. Keni, } *Directors*

### AUDITOR'S REPORT TO THE SHARE-HOLDERS

We have audited the foregoing Balance Sheet of the Presidency Industrial Bank, Ltd., as at the 31st day of December 1952 and also the foregoing Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date in which is incorporated the audited return of Bombay Branch and report that :—

1. We have obtained all the information and explanations we have required and have found them to be satisfactory. 2. The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank. 3. In our opinion, the foregoing Balance Sheet and Profit and Loss Account are drawn in conformity with the Law. 4. Such Profit and Loss Account shows a true Balance of Profit for the year. 5. Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of the affairs of the Bank; according to the best of our information and explanations given to us and as shown by the books of the Bank, and 6. In our opinion, books of accounts have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act, 1913.

POONA CITY,
16th February 1953

B. C. Abhyankar & Co.,
*Chartered Accountants.*

( See Balance Sheet on Page 156 and 157 )

### बँकांच्या कनिष्ठ वर्गाचे पगार व भत्ते.

(शास्त्री ट्रायब्यूनलचा अवार्ड)

कोणास किती रु. पगार मिळेल ?

अ बँका (खेळतें भांडवल २५ कोटींवर)

क्षेत्र १ ४०-२-५४-१-७०-२-७२.
क्षेत्र २ ३६-२-५४-१-६९.
क्षेत्र ३ ३५-२-५४-१-६८.

ब बँका (खेळतें भांडवल ७½ ते २५ कोटी)

क्षेत्र १ ३६-२-५४-१-६९.
क्षेत्र २ ३४-२-५४-१-६८.
क्षेत्र ३ ३२-२-५४-१-६७.

क बँका (खेळतें भांडवल १ ते ७½ कोटी)

क्षेत्र १ ३४-२-५४-१-६८.
क्षेत्र २ ३२-२-५४-१-६७.
क्षेत्र ३ ३०-२-५४-१-६०.

ड बँका (खेळतें भांडवल १ कोटीपेक्षा कमी)

क्षेत्र १ ३२-२-५४-१-६७.
क्षेत्र २ ३०-२-५४-१-६०.
क्षेत्र ३ २८-२-५४-१-६५.

क्षेत्र १:—कलकत्ता, मुंबई, मद्रास, दिल्ली व अहमदाबाद.
क्षेत्र २:—वरील सोडून इतर, १. लक्षापेक्षा अधिक लोकसंख्येचीं गांवें.
क्षेत्र ३:—इतर सर्व गांवें.

महागाई भत्ता किती मिळेल ?

| बँक | क्षेत्र १ | क्षेत्र २ | क्षेत्र ३ |
|---|---|---|---|
| अ | ३५ | ३० | २५ |
| ब | २५ | २२-८ | २० |
| क | १५ | १२ | १० |
| ड | १३ | १२ | १० |

घरभाडें

मुंबई व कलकत्ता:—८ रु.
७ लक्षांवरील लोकसंख्येचीं इतर गांवें:—६ रु.

### भारताच्या शेतीची शिरगणती

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेतकी संघटनेनें जगांतील शेतीविषयीं एक प्रकारची शिरगणती करण्याचें ठरविलें आहे. ह्या शिरगणतींत भाग घेण्याचें उत्तर प्रदेश सरकारनें कबूल केलें असून संघटनेला ज्या प्रकारची माहिती पाहिजे आहे ती पुरविण्यासाठी जरूर ती उपाय-योजनाहि राज्य-सरकार करणार आहे. भारतामधील शेतीची व अर्थव्यवस्थेची रचना कशा प्रकारची आहे तें समजाऊन घेण्यासाठी माहिती गोळा करण्यांत येणार आहे. त्यासाठीं 'सँपल सर्व्हे' पद्धतीचा अंगीकार करण्यांत येणार असून शेतजमिनीच्या एकेकां तुकड्यासंबंधीं आंकडे जमविण्यांत येणार आहेत. अशा पद्धतीनें जमा केलेली आकडेवार माहिती उपयुक्त ठरेल असा अंदाज करण्यांत आला आहे. उत्तर प्रदेशांत चालू वर्षाच्या मे ते ऑगस्ट पर्यंतच्या काळांत 'सर्व्हे' करण्यांत येईल. तो करण्यासाठी ८१,००० रुपये खर्च येईल. खर्चापैकी निम्मी रक्कम राज्य सरकार देणार असून उरलेली निम्मी भारतीय सरकार देणार आहे. १९४८ सालीं भारतामधील राज्यांच्या मुख्य प्रधानांची एक परिषद भरली होती. सदर परिषदेनें अशी सूचना केली होती, कीं एफ्.




ए. ओ. सेन्सस कमिटी ह्या नांवाची एक कमिटी स्थापण्यांत यावी आणि तिनें अन्न व शेतकी संघटनेच्या कार्यांत भाग घ्यावा. ह्या सूचनेला भारतीय सरकारच्या शेतकी खात्यानें मंजुरी दिली असून सर्व राज्य-सरकारांना जरूर ती शेतकीविषयक माहिती गोळा करण्यासाठी आदेश देण्यांत आले आहेत. ही शेतीविषयक शिरगणती पूर्ण झाल्यावर भारताच्या शेतकी व्यवसायासंबंधी बरीच अधिकृत माहिती उपलब्ध होईल.

### इतिहास-प्रसिद्ध जुगारी

लंडनमधील एका वृत्तपत्रानें इतिहास-प्रसिद्ध जुगाऱ्यांविषयीं कांहीं मनोरंजक माहिती प्रसिद्ध केली आहे. इंग्लंडचा राजा चवथा जॉर्ज ह्यानें पत्त्याच्या जुगारावर ८०,००० पौंड घालविले. त्यावेळीं त्याचें वय अवघें २१ वर्षांचें होतें. लॉर्ड मौंटफर्ड हा एक असाच पट्टीचा जुगार खेळणारा होता. एका रात्रींत त्यानें आपला सर्व जमीनजुमला, घर आणि उरलीसुरली सर्व चीजवस्तु घालविली. इतकें करूनहि स्वारीचा मद उतरला नाहीं. त्यानें आपल्या सॉलिसिटरला बोलावून घेतले आणि त्याच्या समोरच स्वतःला गोळी घालून घेतली. ओर्बेन नांवाच्या एका आयरिश जुगाऱ्यानें १७८० मध्यें हार्वे नांवाच्या एका जुगाऱ्याकडून १,००,००० पौंड जिंकले. प्रथम हार्वेनें बोलण्यास सुरुवात केली. नाण्याची ओलीसुकी बोलण्याच्या जुगारास त्यानें प्रारंभ केला, आणि एका क्षणांत ९०,००० पौंड गमावले. तथापि कर्नल मेलिश हा जुगारी सर्वांत निवड्या छातीचा दिसतो. फांशांवर जुगार खेळतांना त्यानें एका वर्षांत १,००,००० पौंड गमाविले. ते परत मिळविण्यासाठी त्यानें आणखी एक डाव खेळण्याचें ठरविलें आणि त्या हातावर ४०,००० पौंड लावले. फांसे उलटे पडले आणि तेही पैसे त्यानें घालविले. इतके पट्टीचे जुगारीसुद्धां कधीं कधीं पैजा मारण्याच्या कामीं कंटाळतात आणि मग मुलखावेगळ्या पैजा मारण्याच्या कल्पना त्यांना सुचूं लागतात. कर्नल मेलिश एकदा असा कंटाळला असता त्यानें समोरच्या खिडकीवरून जाणारी पहिली व्यक्ति स्त्री असेल कीं पुरुष असेल ह्यासंबंधीच पैज लावली. भारतांतहि प्राचीन काळीं द्यूतक्रीडा प्रचलित होतीच.

### धरणयोजनांसाठी भारत-अमेरिका करार

भारत आणि अमेरिका सरकारांमध्यें दिल्ली येथें स्वाक्षऱ्या करण्यांत आलेल्या एका पुरवणी कार्यवाही करारानुसार हिराकुड, घटप्रभा आणि गंगापूर योजनांचें बांधकाम जोरानें चालू करण्यासाठी आवश्यक ती सामुग्री आणि पुरवठा उपलब्ध होईल.

### ग्रेटब्रिटन क्यूबाची साखर घेणार

ग्रेट ब्रिटनमधील साखरेचें रेशनिंग लवकर उठवतां यावें, म्हणून ब्रिटिश सरकार येत्या दोन वर्षांत क्यूबाकडून १०,००,००० टन साखर विकत घेणार आहे.

## दि रत्नाकर बँक लि.

**चेअरमन, श्री. बी. बी. पाटील, ह्यांचा आढावा**

१४ जून १९४३ सालीं आपल्या बँकेची स्थापना होऊन ता. ६ ऑगष्ट १९४३ रोजीं कोल्हापूर व सांगली या ठिकाणीं बँकेनें आपल्या धंद्यास शुभारंभ केला. ३० जून १९४४ असेरचा इंटेरिम रिपोर्ट आपणांस ता. २७ आक्टोबर १९४४ रोजीं सादर केला होता. त्यानंतर गेल्या आठ वर्षांत झालेली प्रगति खालील-प्रमाणें आपल्या निदर्शनास आणूं इच्छितों:—

| ता. ३०–६–१९४४ | एकूण ठेवी | ३१–१२–१९५२ |
|---|---|---|
| ६,२६,१२०–१०–७ | | ४१,६४,४१२–१४–११ |

वरील आंकड्यांवरून आपल्या ध्यानांत येईल कीं, गेल्या नऊ वर्षांत बँकेची उत्तरोत्तर प्रगति होत आली असून १९५२ सालअखेरच्या ठेवी ह्या बँकेच्या सुरुवातीपासून सर्वांत अधिक राहिलेल्या आहेत. बँक प्रगतिपथावर असली तरी चालकांची महत्त्वाकांक्षा पुरी झालेली नाहीं. बँकेचें खेळतें भांडवल किमान १ कोटीचें तरी व्हावें, अशी महत्त्वाकांक्षा आहे व आपणां सर्वांच्या सहकार्यानें ती नजीकच्या काळांत फलद्रूप होण्याचा सुयोग यावा असें इच्छितों. ठेवींचें प्रमाण कसकसें वाढत गेलें हें खालील आंकड्यांवरून आपल्या ध्यानांत येईल.

| | मुदत ठेव | सेव्हिंग्ज ठेव | करंट व इतर | एकूण |
|---|---|---|---|---|
| ३१–१२–१९४८ | ७६० | ११७७ | १८६८ | ३८०५ |
| ३१–१२–१९४९ | ८९३ | १३६९ | १६८९ | ३९५१ |
| ३१–१२–१९५२ | १३८८ | १६०७ | ११६९ | ४१६४ |

वरील आंकड्यांचा सूक्ष्म अभ्यास करतां आपल्या ध्यानांत येईल कीं, १९४८ सालापासून बँकेच्या मुदतठेवींत ८३ टक्के वाढ झालेली आहे. सेव्हिंग्ज ठेवीमध्यें ३६ टक्के वाढ झाली आहे, तर करंट ठेवींमध्यें ३७ टक्के घट निर्माण झालेली आहे.

हिंदुस्तानांतील सर्व शेड्यूल्ड बँकांच्या ठेवीहि वरील काळांत खालीलप्रमाणें राहिल्या आहेत.

| | डिमांड डिपॉझिट्स | टाईम डिपॉझिट्स | एकूण |
|---|---|---|---|
| १९४८ | ६३७ (कोटी) | २९६ (कोटी) | ९३३ |
| १९४९ | ५६४ „ | २६८ „ | ८३२ |
| १९५२ | ५३० „ | ३१७ „ | ८४७ |

हिंदुस्तानांतील सर्व नॉन-शेड्यूल्ड बँकांच्या ठेवी वरील काळांत खालीलप्रमाणें राहिल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १९४८ | १८ (कोटी) | २७ (कोटी) | ४५ (कोटी) |
| १९४९ | १५ „ | २४ „ | ३९ „ |
| १९५२ | १६ „ | ३५ „ | ५१ „ |

वरील आंकड्यांवरून साधारणतः असें म्हणतां येईल कीं, दररोज घालकाढ करणाऱ्या व्यापारी लोकांच्या करंट ठेवींमध्यें थोडी घट निर्माण झालेली असून शेतकरी, फक्त सुरक्षितपणाचा धंदा करणारे व्यापारी व ठराविक उत्पन्नावर संतुष्ट असणारे धनिक ठेवीदार यांच्या ठेवींमुळें सेव्हिंग्ज व मुदतठेवींमध्यें समाधानकारक वाढ झालेली आहे. ही घटना अनेक दृष्टीनें स्थिर स्वरूपाची म्हणूनच राष्ट्राचे दृष्टीनेंहि हितावह अशी म्हणतां येईल. मुदतठेवींमध्यें वाढ होणेस आणखी एक मुख्य कारण म्हणजे अलिकडेच वाढलेले मोठ्या बँकांचे मुदत ठेवींवरील व्याजाचे दर होय. कांहीं मोठ्या बँका १ ते ३ महिने मुदतीच्या ठेवींस २ टक्के व्याज देऊन व्यापाऱ्यांच्या गरजा भागविण्याकरतां ठेवींचा संग्रह करीत आहेत. याबाबत एक तऱ्हेची स्पर्धाच निर्माण झाली आहे.

थोड्याच दिवसांपूर्वी लोकसभेंत सादर केलेल्या पंचवार्षिक योजना व अंदाजपत्रक यांचेबद्दल मला असें वाटतें कीं, सदर पंचवार्षिक योजनेच्या नजीकच्या काळांत वस्तूंच्या किंमती व बँकांचे व्यवहार यावर जरूर परिणाम होईल. हा कार्यक्रम ठरलेल्या वेळेनुसार जर अमलांत आला तर उत्पादनांत व एकंदर व्यवहारांत बरीच वाढ होऊन वस्तूंच्या किंमतींत थोडी प्रगति होऊन, बँकांना अधिक व्यवहार करणेस संधि मिळेल असें वाटतें. व्यापारी मंडळींनीं आपलें व्यापाराचें धोरण आखतांना पूर्वीसारखे फार नफे होतील असें समजूं नये. लहान मुदतीचे व आपल्या आवाक्यांतील व्यवहार केल्यास योग्य ती प्राप्ति होईल व धंद्यास वाढीचें वळण लागेल. परंतु दीर्घ मुदतीचे व भरमसाठ नफ्याच्या अपेक्षेचे व्यवहार करणें हितावह होणार नाहीं, असें तज्ज्ञांचें मत आहे. दिवसेंदिवस मध्यमवर्गीयांची शिल्लक कमी होत असून त्यांची क्रयशक्ति कमी होत आहे, त्याचा परिणाम जीवनोपयोगी वस्तूंचा खप कमी होऊन परिस्थितीनुसार भाव अनिश्चित राहतील. परंतु त्यांचें वळण वाढीपेक्षा मंदीकडेच अधिक झुकेल असें वाटतें. तेव्हां व्यापारी वर्गास पूर्वींइतकींच कर्जें बँकेकडून मिळण्यासाठी व्यवहारांतील चलन समाधानकारक व नियमित राखणें जरूर आहे व यामुळें आपल्या योग्य गरजा पुरविणें आम्हांस शक्य होईल. राष्ट्राचे आपण एक घटक व पंचवार्षिक योजना ही आपल्या व राष्ट्राच्या उद्धारासाठीं आहे, याचें सतत स्मरण ठेवून ती यशस्वी करण्यास सहकार्य करावें अशी आग्रहाची विनंति आहे.

---

## दि मिरज स्टेट बँक लि.

वरील बँकेस १९५२ ह्या वर्षीं १,१६,०४६ रु. निव्वळ नफा झाला. ६% करमाफ डिव्हिडंडसाठी ३६ रु. लागले, २६,००० जनरल रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले, ४४,००० रु. ची इन्कमटॅक्सची तरतूद करण्यांत आली, ९,००० रु. इनव्हेस्टमेंटस खातीं घालण्यांत आले, १,००० रु. बिल्डिंग फंडाकडे वर्ग करण्यांत आले. रिझर्व्ह फंडाची रक्कम आतां ५,२६,००० रु. झाली आहे. बँकेच्या ५४½ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकीं सुमारें १२½ लक्ष रुपये बँकेच्या स्वतःच्या मालकीचे आहेत, ह्यावरून तिच्या मजबुतीची कल्पना येईल. (चेअरमन : व्ही. पी. बेडेकर. मॅनेजर : के. डी. शिराळकर.)

**संक्षिप्त ताळेबंद**

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ६,००,००० | रोख, बँकांत | २०,३५,५४४ |
| रिझर्व्ह, इतर फंड | ६,२४,६५० | इनव्हेस्टमेंटस् | १७,२४,११० |
| ठेवी | ३९,७०,६९४ | कर्जें | १५,१८,३८२ |

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. पुणें २.**
बँकेचें ऑफिस शुक्रवार दिनांक १५ पासून नवीन जागेंत जाणार असून सेफ डिपॉझिट लॉकर्सकरितां नांवें नोंदविण्यास सुरुवात झाली आहे.
लॉकर्ससंबंधी अधिक माहितीकरितां भेटा अगर लिहा—
सी. व्ही. जोग,
मॅनेजर.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८०१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.